| | दुरध्वनी क्रमांक (07132-222312) | जिल्हा परिषद,गडचिरोली<br>कृषि विभाग<br>Email:-adozp_gad@yahoo.co.in |
| --- | --- | --- |
| जा.क्र./जिप.ग/वि.वि./प्रस्ताव/ 1101 /2025 | | दिनांक 29/05/2025. |

**प्रति,**

**मा. जिल्हाधिकारी,**
**गडचिरोली**

**विषय** : जिल्हा खनिकर्म निधी सन 2025-2026 अंतर्गत विंधन विहीर करिता शेतकऱ्यांसाठी 90 टक्के अनुदानावर डीबीटी तत्वावर राबविण्यात येणाऱ्या योजनेचा प्रस्ताव मंजुरीकरीता सादर करणेबाबत.

उपरोक्त विषयांचे अनुषंगाने सविनय सादर करण्यात येते की, जिल्हा खनिकर्म निधी सन 2025-2026 अंतर्गत, किमान 0.40 ha पर्यंत जमीनधारणा असलेले सर्व प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी 90 टक्के अनुदानावर डीबीटी तत्वावर राबविण्यात येणाऱ्या योजनेचा प्रस्ताव रक्कम रु. 17726558/- (**अक्षरी रुपये एक कोटी सत्त्यातर लक्ष सव्वीस हजार पाचशे अठ्ठावन्न फक्त**) मंजुरीकरीता सादर करण्यात येत आहे.

तरी सदर प्रस्तावास आपली मंजुरी मिळावी व कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली या यंत्रणेमार्फत सदर योजना राबविण्याची मान्यता प्रदान करून अनुदान उपलब्ध व्हावे. हि विनंती.

**सहपत्र : 1. प्रस्ताव**

(सुहास ल. गाडे) भा.प्र.से.
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, गडचिरोली**

# प्रपत्र-1

| अ.क्र. | बाब | तपशिल |
|---|---|---|
| 1 | प्रस्तावाचे नांव | जिल्हा खनिकर्म निधी सन 2025-2026 अंतर्गत विंधन विहीर करिता किमान 0.40 हेक्टर पर्यंत जमीनधारणा असलेले सर्व प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी 90 टक्के अनुदानावर डीबीटी तत्वावर राबविण्यात येणाऱ्या योजनेचा प्रस्ताव. |
| 2 | प्रस्ताव सादर करणाऱ्या यंत्रणेचे नांव | कृषि विकास अधिकारी जिल्हा परिषद, गडचिरोली |
| 3 | प्रस्तावाची एकूण रक्कम रुपये | रक्कम रु. 17726558/- |
| 4 | सर्व प्रवर्ग यांचे प्रस्ताव आहेत काय? (होय/नाही) | होय, किमान 0.40 हेक्टर पर्यंत जमीनधारणा असलेले सर्व प्रवर्गातील शेतकरी. |
| 5 | शाश्वत विकास ध्येयाचे कोणकोणती लक्ष्य केंद्रित केले आहे ? तपशील दयावा | अल्प, अत्यल्प, महिला शेतकरी लाभार्थी यांचे करीता पाण्याचा स्तोत्र उपलब्ध करुन शेतीतील उत्पन्नात वाढ करणे व त्यांची आर्थिक स्थिती सुधारणे, रोजगार निर्मिती करणे, रब्बी पिक क्षेत्रात व उन्हाळी हंगामात पिके घेण्यासाठी प्रोत्साहित करणे. |
| 6 | प्रति व्यक्तीसाठी येणारा एकूण खर्च (प्रकल्प किंमत / प्रकल्पातील लाभार्थी सूत्रानूसार) प्रतयक्ष रुपयात दयावा | अंदाजपत्रकानुसार प्रति लाभार्थी रक्कम 1,27,483/-<br>प्रति लाभार्थी 90 % अनुदान रक्कम- 114735/-<br>प्रति लाभार्थी 10% लाभार्थी सहभाग रक्कम- 12748/-<br>एकूण प्रकल्प अनुदान रक्कम — रु. 17210250/-<br>प्रकल्पाचा आकस्मिक खर्च 3%रक्कम-5,16,308/-<br>**एकूण प्रकल्प रक्कम — रु. 17726558/-**<br>एकूण शेतकरी संख्या — 150<br>प्रकल्पातील एकूण लाभार्थी संख्या — 150. |
| 7 | शेतकरी योगदानासाठी तयार आहेत काय? (होय/नाही) असल्यास रक्कम नमूद करावी. | होय, 10% शेतकरी हिस्सा व 90 टक्के अनुदानावर आहे. |
| 8 | कोणत्या शेतकऱ्यांसाठी प्रस्ताव आहे? | किमान 0.40 हेक्टर पर्यंत जमीनधारणा असलेले सर्व प्रवर्गातील लाभार्थी आहेत. |
| 9 | या प्रस्तावाच्या अमलबजावणीची दीर्घकालीन उपयुक्तता काय आहे? | **योजनेचे स्वरुप, व्याप्ती व उपयुक्तता:**<br>अहेरी, एटापल्ली ,मुलचेरा ,भामरागड तालुक्यातील बहुतांश शेतकरी हा अल्प व सिमांतिक जमीनधारणा असणारा शेतकरी असून ही जमीन विभाजीत स्वरुपात आहे. कृषि विभाग जिल्हा परिषद गडचिरोली मार्फत शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबविण्यात येतात ,<br>जिल्ह्यात रबी पिक क्षेत्र वाढ तसेच उन्हाळी हंगामात शेती पिके घ्यावयाची असल्यास सिंचनासाठी पाणी हे प्रमुख उपलब्धता असावी लागते , अल्प भूधारक शेतकर्यांना जमीन कमी असल्यामुळे सदर शेतकर्यांना पाण्याचा स्रोत म्हणून शेततळे किवा विहिरीसाठी जागा उपलब्ध होणे तसेच विहीर बांधणीच ,अडचणीचे जाते, व खर्च जास्त असल्यामुळे बोअरवेल या घटकाची शेतकऱ्यांकडून (विंधन विहीर) मागणी होती.<br>उपअभियंता (यांत्रिकी) यांत्रिकी उपविभाग जिल्हा परिषद, गडचिरोली यांचेकडून 150 मिमी विंधन विहीर (180 mm pvc कॅप सह)खोदकाम करिता 127483/-चे अंदाजपत्रक प्राप्त झाले आहे. त्याअनुषंगाने अहेरी,एटापल्ली ,मुलचेरा भामरागड तालुक्याकरिता जिल्हा खनिकर्म निधी सन 2025-2026 अंतर्गत विंधन विहीर करिता किमान 0.40 हेक्टर पर्यंत जमीन धारणा असलेल्या सर्व प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी 90 टक्के अनुदानावर डीबीटी तत्वावर राबविण्यात येणाऱ्या योजनेअंतर्गत मंजुरी दिल्यास शेतकऱ्यांचे उत्पन्न व आर्थिक दर्जा उंचावण्यास मदत होईल.<br>त्याकरीता या योजनेअंतर्गत प्रस्ताव सादर करीत आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | त्याकरीता या योजनेअंतर्गत प्रस्ताव सादर करीत आहे. |
| 10 | योजनेचे निकष (लाभार्थी गट निवडीचे सविस्तर निकष) | **पात्रता निकष**: 1) या योजनेचा लाभ किमान 0.40 हेक्टर पर्यंत जमीनधारणा असलेले सर्व प्रवर्गातील लाभार्थी यांना देण्यात येईल.<br>2) जे शेतकरी यापूर्वी विंधन विहीर किवा नवीन विहिरीचा लाभ इतर कोणत्याही शासकीय योजनेतून लाभ घेतले असल्यास ते या योजनेत अपात्र ठरतील.<br>3) स्थळ पाहणीच्या वेळी ज्या शेतकऱ्याच्या शेतात नवीन विहीर किवा सिंचनाचे कोणतेही साधन प्रत्यक्षात आढळून आल्यास त्यांना अपात्र करून निवड रद्द करण्यात येईल.<br>4) सामाईक खातेदार सातबारा असल्यास इतर सर्व खातेदारांचे यांचे ना-हरकत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.<br>5) अनुदान अर्थसहाय्य हे 90% असल्यामुळे उर्वरित लागणारा खर्च हे स्वतः लाभार्थ्याला करणे असून, सविस्तर अंदाजपत्रकाप्रमाणे विंधन विहिरीचे काम प्रत्यक्ष पूर्ण झाल्यावरच अनुदान देय राहील.<br>6) स्थानिक परिस्थितीनुसार अंदाजपत्रकापेक्षा काम कमी झाल्यास, वास्तविक मोका तपासणीच्या व मापन पुस्तिकेच्या अधीन राहून अनुदान परिगणना करण्यात येईल.<br>**अनुदान मर्यादा** : किंमतीच्या 90 टक्के<br>योजना राबविण्याची प्रक्रिया :<br>1. या योजनेला तत्वता मान्यता प्राप्त होताच अहेरी, एटापल्ली, मुलचेरा भामरागड तालुक्यातील गट विकास अधिकारी पंचायत समिती या कार्यालयामार्फत योजनेची सविस्तर माहिती देण्यात येईल.<br>2. सदर योजना थेट डी.बी.टी. तत्वावर राबविण्यात येत असल्याने योजनेतील पात्र लाभार्थी आपल्या पसंतीने विंधन विहीर खोदकाम करणार आहे. ई-टेंडर किंवा कोणत्याही प्रकारची जाहिरात प्रकाशन या योजनेकरीता करण्यात येणार नाही.<br>3.पंचायत समिती कार्यालया मार्फत शेतकऱ्यांची मागणी घेण्यात येईल. प्रथम मागणी प्रथम लाभ (First Come First serve Basis) नुसार प्राधान्य देण्यात येईल.<br>4. शेतकरी लाभ घेण्याकरिता अर्ज सबंधित पंचायत समिती, कृषि अधिकारी यांच्याकडे सादर करतील. तसेच भूजल सर्वेक्षण प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर कृषि अधिकारी पंचायत समिती, मौका तपासणी करतील.<br>5. भूजल सर्वेक्षण प्रमाणपत्राची रक्कम जिल्हास्तरावरून परस्पर कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, गडचिरोली यांना देण्यात येईल. सदर रक्कम हि शेतकऱ्याच्या अनुदानातून कपात केली जाईल.<br>6. शेतकऱ्यांचे आधाकार्ड, हमीपत्र / ठराव, बँक पासबुक, इ. आवश्यक कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील. डी.बी.टी. तत्वावर योजना राबविण्यात येत असल्याने कृषि अधिकारी पंचायत समिती, यांचे तपासणी अहवाल सादर करणे आवश्यक राहील.<br>7. पात्र शेतकऱ्यांना तालुक्याच्या लक्षांकाच्या अधिन राहून प्रथम प्राधान्याने लाभ देण्यात येईल. अर्जासोबत जोडलेल्या सर्व कागदपत्राची तपासणी पंचायत समिती, कृषि अधिकारी यांचेकडूनकडुन करण्यात येईल. अर्ज व सर्व कागदपत्रे अचुक असल्यास सबंधित गट विकास अधिकारी कार्यालयाकडुन लाभार्थ्याची निवड करण्यात येईल व लक्षांकानुसार पुर्वसंमती प्रदान केले जाईल.<br>8. शेतकरी विंधन विहिरीचे काम पूर्ण झाल्यांनतर देयके व इतर अनुषंगिक कागदपत्र कृषि अधिकारी पंचायत समिती यांचेकडे अनुदान मिळणेकरीता सादर करतील, त्यानंतर कृषि अधिकारी मार्फत मोका तपासणी करण्यात येईल.<br>9. सदर मोका तपासणी अहवाल पंचायत समिती, कृषि अधिकारी अनुदानाच्या शिफारशोसह कृषि विकास अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद गडचिरोली येथे पाठवतील व जिल्हास्तरावरून सबंधित लाभार्थ्याच्या बँक |

PDF Scanner ACE Scanner

| | | |
|---|---|---|
| | | खात्यात अनुदान थेट डी.बी.टी. कार्यप्रणालीने लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये RTGS/NEFT व्दारे जमा करण्यात येईल.<br>**योजनेचे फायदे :**<br>1. विंधन विहीर खोदकामामुळे जमिनीची बचत होवून जास्तीत जास्त क्षेत्राकरिता पाण्याचे स्त्रोत्र उपलब्ध होवू शकते.<br>2. मजुरांवर होणारा खर्च कमी होवून शेतकऱ्यांच्या निव्वळ उत्पन्नामध्ये वाढ होईल.<br>3. वेळेवर काम झाल्यामुळे उत्पादनाला भाव चांगला मिळेल.<br>4. विंधन विहीर वापरामुळे जास्तीत जास्त क्षेत्र रब्बी पिकाखाली व उन्हाळी पिकाखाली आणता येईल.<br>5. विंधन विहीर वापरामुळे वापरल्यास भाजीपाला व इतर नगदी पिके घेतल्याने रोजगार निर्मीती होण्यास मदत होते. त्यामुळे शेतकरी यांचे उत्पत्र वाढीस मदत होईल. |
| 11 | योजनेची कार्यान्वयीन पध्दत | 1) लाभार्थी निहाय तांत्रिक मान्यता उपअभियंता (यांत्रिकी) यांत्रिकी उपविभाग जिल्हा परिषद, गडचिरोली हे प्रदान करतील.<br>2)कामाचे तपासणी, मापन पुस्तिकेत नोंद व अंतिम देयके तयार करण्याची जबाबदारी सबंधित पंचायत समितीचे कृषि अधिकारी यांची राहील.<br>3)कामाच्या मुल्यांकनानुसार डीबीटी पद्धतीने लाभार्थीच्या बँक खात्यावर जमा करण्यात येईल.<br>4) विद्युत जोडणीकरिता विंधन विहीर पूर्ण झाल्यांनतर MSEB कडे कुसुम किवा कृषि विभागाच्या अन्य योजने अंतर्गत अर्ज करावा. |
| 12 | प्रस्तावाच्या घटकांचा बाब निहाय तपशील (आवश्यकते प्रमाणे) | जिल्हा खनिकर्म निधी सन 2025-2026 अंतर्गत विंधन विहीर करिता अनूसूचित जमातीच्या, शेतकऱ्यांसाठी ९० टक्के अनुदानावर डीबीटी तत्वावर राबविण्यात येणाऱ्या योजनेचा प्रस्ताव.<br>एकुण प्रकल्प किंमत **रु. 1,77,26,558/- (अक्षरी रुपये एक कोटी सत्यातर लक्ष सव्वीस हजार पाचशे अठ्ठावन्न रु. फक्त)** |
| 13 | संस्थेबाबतचा तपशील शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था / महामंडळ इत्यादी | शासकीय, कृषि विकास अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, गडचिरोली |
| 14 | प्रकल्पाचा विस्तृत प्रस्ताव जोडला आहे का ? (होय / नाही) | होय.<br>(जिल्हयातील खाणकाम क्षेत्रात येणाऱ्या प्रत्यक्ष (0-15 km) आणि अप्रत्यक्ष (15-25 km) अंतर्गत येणारी गावांची यादी संलग्न केली आहे) .<br>(खर्चाचे आर्थिकअंदाजपत्रक जोडलेले आहे). |

**कृषि विकास अधिकारी**
**जिल्हा परिषद, गडचिरोली**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, गडचिरोली**

PDF Scanner ACE Scanner